## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- ३१९४/२०२१ मधील तक्रार क्र.४५८/२०२४

**अपिलार्थी, श्री.प्रकाश मोहनदास केसवानी**

बैरक नं.१९१७, रूम नं.२०,
शनि मंदिरच्या मागे, ओ.टी.सेक्शन
उल्हासनगनर, जि.ठाणे ४२१ ००५.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता,
नगररचना विभाग,उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा नगररचाकार,
नगररचना विभाग,उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०८.०४.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १७.०९.२०२१ | ०८.१०.२०२१ | ०३.११.२०२१ | २४.११.२०२१ |

अपिलार्थी यांनी दि. १४.१२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये *"दिलेली माहिती व प्रथम अपिल आदेश असमाधानकारक आहेत."* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०८.०४.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारी श्री.संजय पवार, कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत येणारे क्षेत्र व परिक्षेत्रात शासकिय प्रशासकिय व महानगरपालिका यांचे साठी आरक्षित ठेवलेल्या भूखंडावरील झालेली अवैध अनधिकृत बांधकामाची संपूर्ण सविस्तर लेखी स्वरुपात माहिती द्यावी. "*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये *" माहिती प्राप्त झालेली नाही "* असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.०८.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे.

*"उल्हासनगर शहराच्या विकास आराखड्यामध्ये आरक्षित असलेल्या भुखंडाची नोंदी असलेल्या पुस्ताकाची ६८ पृष्ठे आहेत त्याची १० रु प्रतीपान प्रमाणे ६८० रु.शासकिय शुल्क भरुन उपलब्ध करुन घ्यावी. तसेच आरक्षित भुखंडावरील अतिक्रमणाबाबतची माहिती या कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध नसल्यामुळे ती आपणास देता येत नाही."*

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन, दि.२४.११.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत.

*"जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांनी अर्जदारास माहिती दिलेली आहे. तसेच माहिती अधिकारात मोघम माहिती देता येत नाही."*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागीतलेली माहिती त्यांना अपूर्ण पुरविण्यात आलेली असल्याचे सुनावणी दरम्यान सांगितले. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी हे अनुपस्थित असल्यामुळे, त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहिती बाबत त्यांचे प्रतिनिधी सुनावणी दरम्यान सांगू शकले नाहीत. या कारणामुळे सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य राहिल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि.१०.०६.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

Comp-३

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०८ एप्रिल, २०२४ .

(शेखर चन्द्रे)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

**अपिल क्रमांक : के.आर- ३१९४/२०२१**
**अपिलार्थी, श्री.प्रकाश मोहनदास केसवानी**
**सुनावणी दिनांक १०.०६.२०२४ ( In Continuation of order dt.०८.०४.२०२४)**
**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारी श्री.संजय पवार, कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान सांगितले की, अपिलार्थी यांनी मागीतलेली माहिती ही त्यांच्या विभागाकडे नसून, अतिक्रमण काढण्याची जबाबदारी अनधिकृत बांधकाम निष्कासन विभागाकडे आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग यांनी सदर माहिती अर्ज अनधिकृत बांधकाम निष्कासन विभागाच्या जन माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतरित करणे योग्य होईल. तसेच सदर माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसात माहिती पुरविण्याबाबत निर्णय घेऊन, अपिलार्थी यांना माहिती पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी सदर माहिती अर्ज अनधिकृत बांधकाम निष्कासन विभागाच्या जन माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतरित करावा. तसेच सदर माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी, अनधिकृत बांधकाम निष्कासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी ३० दिवसात माहिती पुरविण्याबाबत निर्णय घेऊन, **अपिलार्थी यांना समक्ष/ नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.
२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(शेखर चन्द्रे)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० जून , २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
विद्यमान जन माहिती अधिकारी, अनधिकृत बांधकाम निष्कासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

**-यांना प्रत**
जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता,
नगररचना विभाग,उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३. यांचे मार्फत प्रत रवाना.

**विवेचन**

तक्रारकर्ता यांनी आयोगास सादर केलेल्या द्वितीय अपिलावरील आदेशानुसार माहिती न मिळालेबाबत दाखल दिनांक ९/८/२०२४ रोजीच्या तक्रारीवर आज दिनांक ४/६/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.संजय पवार, कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग यांचे प्रतिनिधी श्रीमती अनिता डहाले, लिपीक, नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका उपस्थित आहेत. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.दिपक ढोले, सध्या कार्यरत- उप अभियंता, पाणी पुरवठा विभाग, उल्हासनगर महानगरपालिका हे अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना आयोगाच्या आदेशानुसार अद्याप माहिती मिळालेली नाही.

आयोगाने सदर प्रकरणात दि.१०/६/२०२४ रोजी सुनावणी घेऊन "*विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी सदर माहिती अर्ज अनधिकृत बांधकाम निष्कासन विभागाच्या जन माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतरित करावा. तसेच सदर माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी, अनधिकृत बांधकाम निष्कासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी ३० दिवसात माहिती पुरविण्याबाबत निर्णय घेऊन, अपिलार्थी यांना समक्ष/ नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.*" असे आदेश पारित केले होते.

तथापि आजच्या सुनावणीस उल्हासनगर महानगरपालिकेच्या अनधिकृत बांधकाम निष्कासन विभागाचे जन माहिती अधिकारी उपस्थित नाहीत. त्यांचे म्हणणे सादर करणेसाठी त्यांना सुनावणी सूचना काढणे आवश्यक आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. आयोग कार्यालयाने तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा नोडल अधिकारी, अनधिकृत बांधकाम निष्कासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका (दि.१०/६/२०२४ रोजी कार्यरत असणारे) **तसेच** विद्यमान जन माहिती अधिकारी, अनधिकृत बांधकाम निष्कासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांना सुनावणी सूचना काढावी.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा नोडल अधिकारी, अनधिकृत बांधकाम निष्कासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका (दि.१०/६/२०२४ रोजी कार्यरत असणारे) **तसेच** विद्यमान जन माहिती अधिकारी, अनधिकृत बांधकाम निष्कासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी आयोगाच्या सदर प्रकरणातील दि.१०/६/२०२४ रोजीच्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील सुनावणीस आयोगास सादर करावा.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१/७/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ४ जून, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा नोडल अधिकारी, अनधिकृत बांधकाम निष्कासन विभाग, उल्हासनगर मनपा (दि.१०/६/२०२४ रोजी कार्यरत असणारे) **– यांना प्रत**

-- विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
अनधिकृत बांधकाम निष्कासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३. **यांचेमार्फत रवाना.** (सदर आदेशाची प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी संबंधित तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना तात्काळ बजावून पोहोच प्रत आयोगास सादर करावी.)

**विवेचन**

उपरोक्त आदेशान्वये तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आले होते. सदर प्रकरणाची सुनावणी आज दि.१/७/२०२५ रोजी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.संजय पवार, कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांचे प्रतिनिधी श्रीमती अनिता डहाले, लिपीक तसेच जन माहिती अधिकारी श्री.गणेश शिंपी, नोडल अधिकारी, अनधिकृत बांधकाम निष्कासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांचे प्रतिनिधी श्री.शरद एम.परदेशी, वरिष्ठ लिपिक, अनधिकृत बांधकाम निष्कासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका उपस्थित आहेत.

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.गणेश शिंपी, नोडल अधिकारी (अ.बां.नि.वि.), उल्हासनगर मनपा यांनी दि.१/७/२०२५ रोजी आयोगास पत्र सादर केले की, आयोगाकडून सदर सुनावणीस उपस्थित राहणेबाबत संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे. परंतु दि.१/७/२०२५ रोजी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर सुनावणीस मी उपस्थित राहू शकणार नाही. तरी सुनावणीस उपस्थित राहणेसाठी श्री.शरद एम.परदेशी, वरिष्ठ लिपिक, अ.बां.नि.वि. उल्हासनगर मनपा यांना प्राधिकृत करीत आहे.

आजच्या सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.गणेश शिंपी यांचे प्रतिनिधी श्री.परदेशी यांनी भ्रमणध्वनीव्दारे चर्चा केली असता, श्री.शिंपी हे उद्या दि.२/७/२०२५ रोजी सुनावणीस उपस्थित राहू शकत असल्याचे त्यांनी सांगितले.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२/७/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.

राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १ जुलै, २०२५ .

Comp-३